International Journal of Humanities and Social Science Research
ISSN: 2455-2070; Impact Factor: RJIF 5.22
www.socialsciencejournal.in
Volume 2; Issue 11; November 2016; Page No. 83-84

# २१ व्या शतकासाठी महात्मा बसवण्णा

**डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय, देगलूर.

## प्रस्तावाा

माहिती तंत्रज्ञानाने संपुर्ण सृष्टीला आपल्या कक्षेत घेतले असल्याच्या युगात महापुरुषांच्या विचारांची उपयुक्तता किंवा प्रासंगिकता तपासण्याची वेळ येणे ही बाब वर्तमान व्यवस्थेतील उणीवांना दर्शविते. तसेच मानवाच्या वाटचालीवर प्रश्नचिह निर्माण करते. विकासाच्या नावाखाली मानवाने भौतिक प्रगतीचा जो नवा पायंडा निर्माण केला. त्यास महापुरुषांच्या सर्वसमावेशक विचारांचा आधार गरजेचा असल्याचे दर्शविते. या बटन संस्कृतीतील यांत्रिक मानवाला अनादी काळापासुन ते वर्तमानात होवून गेलेल्या महापुरुषांची आठवण त्यांच्यातील मानवतेचे दशन घडविते. प्रस्तुत लेखात अशाच एका महापुरुषांच्या विचारांची ओळख व प्रासंगिकता दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या महापुरुषास संपुर्ण विश्व महात्मा बसवण्णा मादरस या नावाने संबोधते व ओळखते.

१२ व्या शतकात होवून गेलेल्या महात्मा बसवण्णांना २१ व्या शतकातील जग का बरे आठवण करते ? जेंव्हा की त्या काळातील प्रश्न गरजा व परिस्थितीत आज आमुलाग्र बदल झाला. बदल हा सृष्टीचा नियम आहे. या नियमास जरी प्रमाण मानले तरी प्रश्न तोच की आज या महापुरुषांना का आठवायचे ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ज्या समाजाला त्याचा इतिहास माहित नसतो तो समाज आपले वर्तमान व भविष्य घडवू शकत नाही. मग आपला वैभवशाली इतिहास समजून घेण्यासाठी बसवण्णांना समजुन घ्यायचे का ? का याहीपेक्षा कांही वेगळी कारणे सांगता येतात. लंडन शहरात थेम्स नदीच्या किनारी भारतीय पंतप्रधान मा.नरेंद्र मोदींनी महात्मा बसवण्णांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केले. ऑस्ट्रेलियाच्या सिडनी शहरात बसवण्णांचा पुतळा उभा राहणार आहे. अशा विविध देशात महात्मा बसवण्णांचे विचार व कार्य मान्यता पावत आहेत.

भारतात डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम राष्ट्रपती असताना भारतीय संसदेच्या आवारात महात्मा बसवण्णांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. याहीपेक्षा बसवण्णांनी १२ व्या शतकात आखिल मानव जातीच्या कल्याणाचा जो विचार मांडला, त्या विचारांची मांडणी वारकरी चळवळ, फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ व भारतीय राज्यघटनेतून झ ााल्याचे स्पष्ट होते. महात्मा गौतम बुध्द-महात्मा बसवण्णा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जरी वेगवेगळ्या कालखंडातील महापुरुष असले तरी त्यांच्या विचारात समताधिष्ठित समाजाच्या स्थापनेचा त्यांच्या जिवंतपणासाठी समान आदर्श नागरिक घडवण्याचा जो कृतीशील आचारसंहितेचा कार्यक्रम आहे. यामुळे त्यांची वर्तमानात प्रासंगिकता जाणवते.

वर्तमान युग शस्त्रास्त्राच्या भांडाराने भरलेले आहे. जे द्वेष, संघर्ष, युध्द व परस्पर विश्वास निर्माण करते. बसवण्णांनी समता, मानवता व नैतिकतेनेयुक्त वचन साहित्याच्या भांडाराने भरलेल्या युगाची निर्मिती केली. मानवातील स्वार्थ व दुटप्पीपणाच त्याच्या व इतराच्या विनाशास कारणीभूत असतो म्हणुनच सदाचारात स्वर्ग असून त्याच्या निर्मितीसाठी स्वतःचे घर अनुभवमंटपास खुले करुन देणारा बसवण्णा नावाचा महापुरुष एका पतीसाठी उंचच उंच मनोऱ्याचे घर बांधणाऱ्या अंबानीस आत्मपरीक्षण करावयास लावणारा आहे. लोकशाही असतानाही लोकशाहीप्रमाणे शासन व्यवस्था चालत नसल्यामुळे धनिकशाही व ठोकशाही असे लोकशाहीचे विश्लेषण अभ्यास करतात. परंतु महात्मा बसवण्णांनी १२ व्या शतकातील राजेशाही, सरंजामशाहीस अध्यात्मिक समताधिष्ठीत, सामाजिक व आर्थिक लोकशहीत कसे रुपांतरीत केले हे आजच्या राज्यकर्त्यावर्गांनी अभ्यासण्यासारखे आहे. अच्छे दिन आएंगे असे म्हणत ज्यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवले. त्यांनी अच्छे दिना म्हणजे नेमके काय? हे समजुन घेण्यासाठी बसवप्रणित कल्याणराज्याची व्यवस्था अभ्यासावी. अमेरिका राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व कुवेत या देशांनी दहशतवाद व सुरक्षिततेच्या कारणामुळे कांही मुस्लिम देशांच्या नागरिकांना आपल्या देशात प्रवेश बंदी केली. या उलट १२ व्या शतकात काश्मिर, अफगाणिस्तानासह देश व जगातील अनेक भागातील नागरिक बसवण्णांचे नाव ऐकून कल्याणमध्ये येत असत. अशा येणाऱ्यात बरेचजण डाकू व दरोडेखोर होते. ते कुकर्मी आहेत तरी बसवण्णांनी पंतप्रधापदी असतानाही त्यांना प्रवेश नाकारला नाही तर उलट त्यांचे हृदय परिवतन करुन आदर्श नागरिकात रुपांतरण कसे केले हे सध्याच्या राज्यकर्त्यांनी जाणुन घ्यावे.

कर चुकवेगिरी, चलनांचे फसवेगिरी, वाढता भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी झ नोटाबंदीचा निर्णय घेण्यात आला. परंतू १२ व्या शतकात महात्मा बसवण्णांनी अर्थव्यवस्थेतील दोषाला ओळखून लोकांना कायक वे कैलास, दासोहचा संदेश देवुन कर प्रामाणिकपणे राज्याच्या तिजोरीत आणून भरण्याची सवय लावली. ज्यामुळे बिज्जलाची तिजोरी भरभरुन वाहत होती. मागणाऱ्या हातापेक्षा देणारे हात अधिक होते. प्रशासनातील भाई-भतिजावाद व दप्तर दिरंगाईला नष्ट करण्यासाठी प्रशासनातील कर्मचाऱ्यांची भरती व बढती क्षमता व पात्रतेुसार करावी याचा उत्तम झ नमूना स्वतःच्या कारकुनापासून पंतप्रधानापर्यंतच्या बढतीतून दिला. बिज्जलाच्या दरबारात राज्याचे काम करताना राज्याच्या दिवा व स्वतःचे काम करताना स्वतःचा दिवा लावून काम करणारे बसवण्णा आजच्या प्रशासकासाठी उत्तम आदर्श आहेत. माणुस म्हणून आपण सर्वजचण समान आहोत. सर्वांनाच जगण्याचा अधिकार आहे. व्यक्तिचा जगण्याचा हक्क मान्य करुन तो अमान्य करणाऱ्या यंत्रणांना नष्ट करण्याची प्रजाप्रभुत्वाची यंत्रणा १२ व्या शतकात रुजवली. स्त्री, पुरुष, बालक, वृध्द, अपंग या सर्वांच्या मानवी हक्कांचे रणशिंग १० डिसेंबर १९४८ ला संयुक्त राष्ट्र संघटनेने फुंकले. परंतु महात्मा बसवण्णांचा अनुभवमंटप मानवी हक्कांचे सुंदर अविष्कार आहे. तर या अविष्कारातून उत्पन्न होणारे वचन साहित्य मानवी हक्कांची सनदच आहेत. २१ व्या शतकात महाराष्ट्र शासन अंधश्रध्दा निर्मुलााचा कायदा योग्य पध्दतीने पास करत नाही. बसवण्णांचे वचन साहित्य म्हणजे अंधश्रध्दा निर्मुलनासाठी रामबाण औषध आहे. स्त्रीवादी चळवळ, पर्यावरणाची चळवळ, भ्रष्टाचार निर्मुलन चळवळ, मानवी हक्क चळवळ, दलित चळवळ, शेतकरी चळवळ अशा विविध चळवळीस पोषक व प्रेरक ठरेल असे तत्वज्ञान व कार्याची दिशा बसवण्णांच्या वचन साहित्यात आहे.

महात्मा गांधी कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी कर्नाटकात गेले असता म्हणतात मला याची जाणीव आहे मी अशा महापुरुषांच्या कर्तृत्वाने पावन झालेल्या भूमीत आलो. ज्या महापुरुषाने १२ व्या शतकात समाज परिवर्ताचे कार्य केले तेच कार्य मी या शतकात करत आहे. याचा अर्थ बसवण्णांनी त्यांच्या काळात सर्वच प्रश्नांचे उत्तर शोधले परंतू नंतरच्या पिढीला ते उत्तर टिकवता व रुजवता आले नाही. यामुळे प्रश्नांची गुंतागुंतता वाढली. मानवी मनातील स्त्री व संपत्तीचे आकर्षण नष्ट व्हावे म्हणून त्यात दासोहवृत्ती निर्माण केली. या पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण करता येतो तो इतरत्र कोठेही नाही. यासाठी सर्वांनी आपले काम प्रामाणिकपणे व निष्ठेने करावे. कायक हाच एकमेव या पृथ्वीला स्वर्ग बनवण्याचा मार्ग असल्याचे बसवण्णानंतर महात्मा गांधी, कार्ल मार्क्स, अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तर स्वतः कायकाच्या आधारावरच स्वतःचे श्रेष्ठत्व सिध्द करुन समाजातील अनेक विद्वान व महान व्यक्तींना नतमस्तक व्हायला भाग पाडले.

बसवेश्वरांचा काळ आणि वर्तमान काळ वेगळा आहे. परंतु प्रश्नाचे स्वरुप सारखेच आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे प्रश्नांची व्याप्ती वाढली. सामाजिक मानवाचे आर्थिक व तांत्रिक मानवात रुपांतरण झाले. गांभीर्याचा अभाव, वाढता ताण-तणाव, स्वतःला व इतराला समजून घेण्याच्या वृत्तीचा अभाव, संपत्तीच्या संग्रहाची वाढती वृत्ती, राज्यकर्त्याची दिशाहीनता, लोकशाहीला धनिकशाहीत रुपांतरित करण्याच्या दिशेने वाढणारा राजकीय सहभाग, लोकानुरंजावादी प्रवृत्ती, गुन्हेगाराचा राजकारणातील व

धोरण निर्धारणातील सहभाग अशा अनेक कारणांमुळे महापुरुषांच्या विचारापासून फारकत घेणारा मनुष्य व समाज वाढला आहे. या सर्व बाबी प्रत्येक महापुरुषांच्या कालखंडात होत्या. आजच्याप्रमाणे सुधारणा, माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट, दळणवळण व प्रसार माध्यमांची रेलचेल नसलेल्या काळात बसवण्णांनी शरण व जंगमाच्या रुपाने प्रसार माध्यमांचे जाळे निर्माण करुन मुल्याधिश्ठीत विचारांचा प्रसार करुन आदर्श समाज उभा केला. तसे करण्याप्रती निष्ठा त्यांना त्या दिशेने घेवुन गेली. आज फक्त गरिबी हटाव, जय जवान जय किसान जय विज्ञान, इंडिया शायनिंग, अच्छे दिन आयेंगे, कुशल भारत कौशल्य भारत, भ्रष्टाचारमुक्त भारत, एड्समुक्त भारत, गांधीवादी भारत, फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र अशा घोषणा दिल्या जातात. जयंतीच्या दिवशी महापुरुषांच्या समाधीवर प्रतिमा व पुतळ्याला हार घातला जातो. त्यांच्या आठवणीत चार शब्द गायले जातात. मिरवणुकीचा जथ्था निघतो. तरुणांना आनंद व जल्लोष करण्यासाठी एक दिवस मिळतो. पण बसवण्णांच्या विचारांप्रमाणे आचरण करण्यास कोणी मठाधिश, अभ्यासक व संशोधक सांगत असेल तर त्यांच्याकडे कानाडोळा होतो.

बसवण्णांसह इतर अनेक महापुरुष या देशात जन्मले ही या देशाची ऐतिहासकि शिदोरी आहे. बसवण्णांचे वचन साहित्य त्रिकालाबाधीत सत्य आहेत. समाजोपयोगी व समाज बांधणीच्या कार्यासाठी कल्याणच्या परिसरात अहोरात्र पायपीट करणारा हा महात्मा आखिल माावजातीच्या प्रश्नाचे उत्तर अनुभवमंटप, इष्टलिंग, दासोह, कायक वे कैलास, अरिवे गुरु या पंचसुत्रीत मांडतो. एक समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, वैज्ञ ाानिक, उत्तम संघटक, कुशल प्रशासक, राजाीनितज्ञ व समाजाची नस ओळखणारा अध्यात्मिक उंचीचा महापुरुष बसवण्णा कुडलसंगम, मंगळवेढा, कल्याणच्या परिसरात फिरुन समाजबांधणीच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या बहुजन समाजाला रोजगार, लिखाण व देश घडवण्याच्या कार्यासाठी संधी देवून त्यांच्यातील क्षमता विकसित करतो. परंपरेने ठरवून दिलेल्या अनेक सनातन्यांच्या माागुटीवरील संकुचित धर्माची झ ाालर नाहिशी करुन धर्मनिरपेक्ष व समाजवादी व्यवस्थेची पेरणी करतो. २१ व्या शतकातील प्रत्येक प्रश्नांचे उत्तर बसवण्णांच्या तत्वज्ञनात आहे. परंतू दूर्दैव त्या तत्वज्ञ ाानाकडे पाठ वळवून एक नजर टाकण्या इतपतच्या उसंत आपणास नाही.

महापुरुषांच्या विचाराकडे होणारी डोळेझाक आपणास विनाशाच्या दिशने घेवून जाईल. त्यामुळे महापुरुष आणि त्यांचे विचार हा आपल्या सुखी व संयमी जीवनाचा मुलमंत्र आहेत. आनंदी कसे जगायचे, जीवन जगण्याची कला, रोगमुक्त जीवन अशा विशेषणने युक्त विविध वर्गाकडे आपण पैसे देवून जातो. पण महापुरुषाने सुखी जीवनाचा जो मुलमंत्र दिला त्याकडे होणारे दूर्लक्ष आपल्या विनाशास कारणीभुत आहे. या विनाशास टाळण्यासाठी आपण बसवण्णासह इतर महापुरुषांच्या विचारांची कावड हातात घेऊया.

**संदर्भ ग्रंथ**

1. आद्यसमाजसुधारक महात्मा बसवेश्वर-डॉ.अशोक मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी.
2. २० व्या शतकातील समाजसुधारणेचा इतिहास - संपादक - प्रा.व्ही.बी.पाटील-के.सागर प्रकाशन, पुणे.
3. क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर-प्रा.डॉ.अशोक मेनकुदळे-महाराष्ट्र बसव परिषद, भालकी.
4. समग्र क्रांतीप्रवर्तक महात्मा बसवेश्वर-संपादक-बस्वराज स्वामी, अमृता प्रकाशन लातूर.
5. विचारवंत आणि समाज-संपादक डॉ.अशोक चौसाळकर-द युनिक अॅकडमी, पुणे.
6. गांधी, आंबेडकर, दलित एवं सामाजिक न्याय-डॉ.बबीता वर्मा, अविष्कार पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, जयपूर.
7. मध्ययुगीी संत साहित्य : कांही आयाम-डॉ.यू.म.पठाण-स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
8. जगतज्योती बसवेश्वर-डॉ.सुर्यकांत घुगरे-महाराष्ट्र बसव समिती, नांदेड.